खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर

**प्रथम वर्ष कला**

सेमिस्टर दुसरे

# इतिहास

# भारतीय राष्ट्रीय आंदोलन (१९२०-१९५०)

# घटक २ : मुक्ती चळवळ

# घटक २ : मुक्ती चळवळ

## शेतकरी चळवळ

### प्रास्ताविक

भारतात शेतीमुळे समृध्दी व समृद्धीमुळे परकीय आक्रमणे झाली. बहुतांश आक्रमक ही भारतीयच होऊन गेले. मात्र इंग्रजांची सत्ता या सगळयापेक्षा वेगळी होती. स्वत:च्या सत्तेस उपयुक्त व्यवस्था त्यांनी निर्माण केल्या. व्यापारी इंग्रज कंपनीने स्वत:ला फायद्याची महसूल व्यवस्था निर्मांण केली.शेतक¹यांवरील कराचा बोजा वाढला. दुष्काळातही सारा वसुली केली. इंग्रजांना हवी तीच पिके घ्यावी लागत होती त्यामुळे शेतीचे व्यापारीकरण झाले. जे शेतकऱ्यांना हितावह ठरले नाही. शेतीची दुर्दशा वाढतच गेली. जमीनदार, सावकार, मध्यस्थ दलाल व शासकीय अधिकारी शोषण करत होते. त्यामुळे शेतक¹यांची दु:खे वाढतच होती. आपल्या दु:खास सरकार जबाबदार असल्याचे लक्षात येऊन शेतक¹यांनी अनेकदा उठाव केले. संघटना उभारल्या. अर्थात त्यात एकसंघपणा व देशपातळीवर एकच नेतृत्त्व नव्हते.आपल्या आर्थिक प्रश्नातून स्थानिक पातळीवर हे लढे उभे राहिले.इतर वर्गीयांच्या मदती अभावी व एकसंघा अभावी हे उठाव इंग्रजांना सहज दडपता आले.पुढे राजकीय चळवळी बरोबर घातली जाऊ लागलेली सांगड दळणवळणाची वाढती साधने व जाणीव जागृती यामुळे ही चळवळ लक्षणीय बनत गेली. या चळवळीच्या मुळाशी शेतक¹याच्या अनेक समस्या होत्या त्या पुढील प्रमाणे...

### भारतातील शेतीच्या समस्या

१) शेतीची जमिनीची मालकी कसणाऱ्याकडे नसणे. २) शेती अनिश्चित मोसमी पावसावर अवलंबुन असणे. ३) पाण्या अभावी एक पिक पद्धतीचा अवलंब करणे. ४) नव्या तंत्रज्ञानाविषयी अज्ञान व भती असणे. ५) भांडवल नसल्याने मागास तंत्रज्ञान, निकृष्ट खते व बियाणांचा वापर. ६) पिक घेण्याचे स्वातंत्र्य नसणे. ७) शेतमाल साठवणूक सुविधेचा अभाव असणे. ८) शेतमालास योग्य रास्त भाव मिळत नाही. ९) शोषण करणारी मोठी मध्यस्थांची साखळी. १०) सरकारची डोईजड कर आकारणी. ११) जमिनीचे मोठ्याप्रमाणावर होत असलेले तुकडीकरण. अशा विविध समस्यांमुळे शेतकरी चळवळ विकसित होत गेली.

### १९२० पूर्वीची शेतकरी चळवळ

चुमारांचे बंड (१७६८ - मिदनापूर), पागल पंथीयांचे बंड (१८२५), कोलचा उठाव (१८३१ - छोटानागपूर), फराजी पंथ बंड (१८३८ ते १८५७), संथाळ उठाव (१८५५ - भागलपूर राजमहल), महाराष्ट्रात उमाजी नाईकांचा लढा (१८२६ ते २९), भील्ल व कोळी उठाव (१८२४ ते १८३५)

बिहारातील नीळीचे बंड, बंगालात कुळांचा जमिनदारांविरूद्ध उठाव (१८७२ ते १८७६), चंपारण्य सत्याग्रह, खेडा सत्याग्रह असे अनेक प्रसिध्द लढे उभारले गेले.

### १९२० नंतरची शेतकरी चळवळ

### मोपला बंड

आठव्या व नवव्या शतकात केरळमध्ये स्थायिक मुस्लिम शेतकऱ्यांना मोपला म्हणत. हिंदू जमीनदारांचे पट्टेदार म्हणून मोपला काम करत. पुढे जमीनदारांबरोबर त्यांचे काही वाद निर्माण झाले. त्यामुळे तेथे जवळपास २२ वेळा उठाव होऊन मोपल्यांनी जमीनदारांच्या हत्या केल्या. सरकाने त्यास धार्मिक रंग दिला. तिरूरांगडीच्या मशिदीत इंग्रजांच्या प्रवेशावरून १९२१ मधील मोपला बंडास पुन्हा सुरुवात झाली. या बंडात धार्मिक प्रश्नही गुंफला गेला पण ही मुळात मोपला शेतकऱ्यांची चळवळ होती.

### मुळशी सत्याग्रह

पुण्याजवळ वीजनिर्मितीसाठी धरण बांधले जाणार होते.त्यात शेतक–यांची बरीच जमीन जाणार होती.तर तुलनेने मोबदला मात्र अंत्यत अल्प मिळणार होता.सेनापती बापटांनी याविरोधात लढा उभारला.अखेरीस शेतक–यांना मोबदला वाढवुन मिळाला.

### कृषक संघम

आगाऊ खंड वसुली व जमीन धारणा सारख्या प्रश्नातून समाजवादी काँग्रेसमाध्यमातून केरळमध्ये शेतकरी चळवळीला सुरुवात झाली. मोर्चे काढण्यात येऊ लागले. एकीचे बळ लक्षात येऊन कृषक संघाची निर्मिती झाली. या संघमनी ६ नोव्हेंबर १९३८ हा दिवस कुळकायदा दुरूस्तीदिन म्हणून साजरा करून कुळकायदा दुरुस्ती आंदोलन व्यापक केले. चेवायूरला संमेलन घेतले. पी कृष्ण पिल्लाई संमेलनाचे अध्यक्ष होते. कुळ कायदा दुरुस्ती ही यांची मुख्य मागणी होती.

### अवध कुळ कायदा

अवध प्रदेशातील जमीनदारा कुळांची पिळवणुक करत.या विरोधात बाबा रामचंद्र यांनी लढा उभारला.अखेरीस वाढता असंतोष लक्षात घेऊन इंग्रजांना १९२२ मध्ये अवध कुळ कायदा करून कुळांना सरंक्षण द्यावे लागले.

### आंध्रातील शेतकरी चळवळ

जमीनदारांचा जाच व जमीन महसूल वाढीमुळे आध्रात शेतकरी लढ्यास सुरुवात झाली कुळ कायद्याच्या प्रश्नाने शेतकरी एकत्र आले.सरकार व जमीनदार विरोधात आध्राच्या किनारपट्टी भागात 'आंध्रप्रदेश रयत संघटना', 'आंध्र जमीन रयत संघटना', 'भारतीय शेतकरी संस्था' अशा संघटनानी लढा दिला. १९३७ च्या निवडणुकीत जमीनदार पक्षाच्या उमेदवाराचा

पराभव झाला. बोब्बिली, मुगाला व कालीपटनम् येथील जमीनदारांविरोधात आंदोलन झाले. १९३८ ला आंध्रप्रदेश शेतकरी परिषदेच्या मोर्चात २००० शेतकरी सहभागी झाले. सततच्या लढ्याने जागृती वाढून लढ्याचा विस्तार झाला. जंगल कायदा विरोधात नरसिपट्टण तालुक्यात अल्लुरी सीताराम राजु नेतृत्त्वात सुरु झालेला लढा इंग्रजांनी दडपला.

**पंजाबातील शेतकरी चळवळ**

१९३० दरम्यान पंजाबात स्थापन झालेल्या किसान सभा माध्यमातून जागृती झाली. १९३७ मध्ये 'नौजवान भारत सभा', 'कीर्ती किसान काँग्रेस' व अकाली दलाच्या कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्नांनी शेतकरी वर्गात जागृती घडवून आणली. पंजाबात प्रांतीक मंत्रीमंडळात जमीनदारांचे प्राबल्य असल्याने शेतकऱ्यांचा रोख त्यांच्या विरोधात होता. कालव्यावरील कर वाढ विरोधात मोर्चे निघाले. लाहोरचा मोर्चा फार मोठा होता. शेतकऱ्यांनी स्वतःला अटक करून घेतल्या. मुलतानमध्ये खाजगी संस्थांनी जमीनी खंडाने घेतल्या होत्या तेथील बटाईदारावर रद्द झालेले करही लावले. त्यामुळे तेथे संप केल्याने जमीनदारांना माघार घ्यावी लागली.

**पूर्व भारत - बिहार**

स्वामी सहजानंद सरस्वतींनी बिहारमध्ये शेतकऱ्यांचे संघटन केले. कार्यानंद शर्मा, राहुल सांकृत्यायन, पंचानन शर्मा, यदुनंदन शर्मांनी गावोगाव जाऊन जागृती केली. शेतकऱ्यांचे मेळावे, सभा, संमेलने, निदर्शने यांचे आयोजन केले. १९३५ मध्ये किसान सभेनेची जमीनदारी नष्ट करा भूमिका फार लोकप्रिय झाली. १९३८ ला पाटण्यात लाखभर शेतकऱ्यांचा मेळावा झाला. कर व कुळ समस्या त्यात प्रामुख्याने मांडल्या गेल्या. कुळ जमीनी विषयक मागणीतून रेबोरा आंदोलनास यश मिळाल्याने दरभंगातही आंदोलनाला सुरवात झाली. जमुना कारजी नेतृत्त्वात सत्याग्रहाचा मार्ग अवलंबण्यात आला. शेतकऱ्यांना अटक करूनही चळवळ विस्तारत गेली. त्यामुळे शेतकरी मागण्या मान्य कराव्या लागल्या.

**बंगाल**

जमीनधारणा, कर व कर्ज विषयक प्रश्नातून बंगालात शेतकरी संघटित झाले. बंकीम मुकर्जी नेतृत्वाखाली बरवानच्या शेतकऱ्यांनी दामोदर कालवा पाणीपट्टीवरून लढा दिला. एप्रिल १९३८ मध्ये २४ परगण्यातील शेतकऱ्यांचा कलकत्त्यात मोर्चा निघाला. त्यांच्या अनेक मागण्या मान्य झाल्या. बंगाल जमीन महसूल आयोगाने जमीनदारांना द्यावयाचा वाटा वाढविल्याने १९४६ बराईदारांची चळवळ सुरू झाली. हजाँग च्या शेतकऱ्यांनी खंड पैशाच्या स्वरूपात घेण्याची मागणी केली. शेतकरी सभेने अनेक प्रश्न मांडले. शेतकरी व जमीनदार संघर्ष सरकारच्या जमीनदार अनुकूल धोरणामुळे वाढला

## ओरीसा, आसाम व इतर प्रांत

शेतकरी चळवळीमुळे ओरिसा प्रांतिक काँग्रेस समितीला शेतकरी प्रश्नांची दखल घेऊन जाहीरनामा घोषित करावा लागला व १९३७ मध्ये आलेल्या मंत्रीमंडळाने शेतीविषयक कायद्याचा मसूदा मांडला. ओरिसातील लढ्यात वेठबिगारी व खंडाचे प्रमाण हे दोन मुख्य प्रश्न होते. ओरिसातील या लढ्यात आदिवासीचा सहभाग ही लक्षणीय होता. धनकानाला या संस्थानातील शेतकरी चळवळ तेथे झालेल्या अत्याचारामुळे विशेष गाजली. आसाममध्ये सुरमा खोऱ्यातील खंडबंदीची करुणासिंधू रॉय नेतृत्वातील कुळकायद्यात दुरूस्तीची चळवळ विशेष प्रभावी व प्रसिध्द झाली. गुजराथमध्ये वेठबिगारीचे (हाळी बांधुआ) निर्मुलन चळवळ यशस्वी झाली. मालगुजारी, जास्त कर व  कर्जवसुली विरोधात नागपूरपर्यंत मोर्चा नेण्यात आला. खेड व सुरतच्या शेतकऱ्यांनी कर बंदी केली. बडोदा सरकारकडून शेतकऱ्यांना आश्रय देण्यात आला. करबंदी (महसूल बंदी) बरोबर उत्तरप्रदेशात खंडबंदी चळवळ ही सुरु झाली.

## साम्यवादी प्रभाव

१९१७ मध्ये रशियात साम्यवादी क्रांती यशस्वी झाल्यानंतर त्याचा प्रभाव भारतात पडून येथेही साम्यवादी चळवळींना चालना मिळाली.कम्युनिस्ट पार्टी आ^फ इंडीया स्थापन झाली.तर हिंसक मार्ग न रूचल्याने अनेकांनी काँग्रसमध्ये राहुनच कार्य करणे पसंत केले.काँग्रस मध्येच एक समाजवादी गट स्थापन झाला.पुढे स्वतंत्र समाजवादी पक्ष ही अस्तित्वात आला.या पक्षांनी शेतक–यांच्या प्रश्नावर सतत चर्चा घडवुन आणली. १९१८ नंतर शेतक–यांचे लढे अधिक संघटित रूप धारण करू लागले.तसेच शेतक–यांचे राष्ट्रीय चळवळीशी नाते जोडले गेले.

## काँग्रेसचे लक्ष व किसान सभा

काँग्रेसचे राजकीय लढयावर लक्ष केंद्रित असले तरी त्यांना शेतकरी प्रश्नाची दखल घ्यावी लागली.प्रो.एन.जी.रंगा व स्वामी सहजानंद यांनी काँग्रेसचे लक्ष शेतकरी प्रश्नाकडे वेधण्याचा प्रयत्न केला.१९३६ मध्ये काँग्रेसने पहिल्यांदा आपले अधिवेशन खेडयात घेतले.या फैजपूर अधिवेशनातही काँग्रेसचे शेतक–यांकडे दुर्लक्ष होत असल्यावरून टिका झाली. काँग्रेस जमीनदार व शेतकरी दोघांनाही धरून होती.त्यामुळे काँग्रेसवर टिका होत होती.सर्व शोषक घटकांना विरोध करण्यासाठी संघटना उभारण्यासाठी प्रयत्न होऊ लागले होते. कम्युनीस्ट नेते डॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रेरणेने बंगाल पंजाब व संयुक्त प्रांतात १९२० मध्ये किसान सभा स्थापन झाल्या. १९२८ मध्ये आंध्र प्रांतिक किसान सभा संघटित करण्यात आली.

## अखिल भारतीय किसान सभा

सविनय कायदेभंगाच्या चळवळीतून व समाजवाद्यामुळे शेतकरी संघटना विकासास चालना मिळाली. त्यातून शेतकरी चळवळीत समन्वय साधण्यासाठी 'अखिल भारतीय किसान परिषद' स्थापन झाली. त्यासाठी अनेक नेत्यांनी व एन.जी.रंगा यांनी पुढाकार घेतला होता. या परिषदेचे पुढे अखिल भारतीय किसान सभेत रूपांतर झाले. गांधीजीनी ग्रामीण भागास दिलेल्या महत्त्वामुळे कॉग्रेसचे अधिवेशन ग्रामीण भागत (फैजपूर, १९३८) भरविण्यात आले. अधिवेशनात जमीन सरकारची किंवा जमीनदारांचीही नसून कसणाऱ्यांची आहे असे गांधीजीनी सांगितले. फैजपूर अधिवेशन प्रभावातून अखिल भारतीय किसान समीतीच्या बैठकीत (मुंबई) किसान जाहिरनामा मांडण्यात आला. त्यात इतर समस्याबरोबर किसान संघटनांना अधिकृत मान्यता मिळावी अशी मागणीही करण्यात आली. १९३७ मध्ये सत्तेवर आलेल्या काँग्रेस मंत्रीमंडळांनी शेतकरी हिताचे कायदे केले. शेतकरी परिषदाना काँग्रेस नेते मोठ्या संख्येने जाऊ लागले.

लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या उपस्थितीत नरेंद्रदेव अध्यक्षतेत अखिल भारतीय किसान सभेचे अधिवेशन गया (९ एप्रिल १९३९ ) येथे झाले. त्यामुळे शेकतकऱ्यांच्या मागण्यांकडे सर्वांचे लक्ष वेधले. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यानाही या लढ्यासाठी बळ वाढवायचे असल्याने शेतकरी प्रश्नाची दखल घेणे क्रमप्राप्त झाले होते. दुसरे महायुद्ध काळात शेतकरी चळवळीचा जोम काहीसा कमी झाला. साम्यवादी रशियासाठी अनुकूल भूमिका घेण्यावरून साम्यवादी पक्षातही दुही वाढली. राष्टवादी व साम्यवादी वादही वाढला. त्यातून शेतकरी सभेचे विभाजन (१९४३) झाले. महायुद्धानंतर सत्तांतराविषयी वाटाघाटी सुरू झाल्या त्याबरोबर शेतकऱ्यांमध्येही नवचैतन्य निर्माण होऊन भारताच्या विविध भागात शेतकरी प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न सुरु झाले.

**समारोप**

सुरवातीला शेतकऱ्यांची चळवळ त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरूद्ध होती. या चळवळीत शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर असल्याने ही जनसामान्याची चळवळ होती. त्यांचा रोख परदेशी मळेवाले, जमीनदार व सावकार यांच्या विरूद्ध होता. या चळवळींचा प्रादेशिक विस्तारही मर्यादित होता. दीर्घकालीन सातत्य व संघटन यांचा अभाव होता. अत्यांतिक जुलूम अवाजवी व असामान्य शोषण व पिळवणूक आणि आपली शेती जाण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतरच शेतकरी उठाव करीत असत. जमीनदारी व सावकारी पद्धतीच्या विरोधात त्यांचा लढा नव्हता. तर जमिनीवरून हाकलून लावले जाईल, अवाजवी कर आकारणी व सावकाराची फसवाफसवी यांना त्यांचा प्रखर विरोध होता. अशिक्षित, आडाणी व निःशस्त्र असूनही शेतकऱ्यांचे असामान्य धैर्य, समर्पण भावना, संघटनांची कुवत, जात व धर्म यांच्या पलीकडे

जाणारी ऐक्य भावना इत्यादींची प्रचीती या लढ्यात दिसून आली. शेतकरी चळवळींचा वसाहतवादास विरोध नव्हता. वसाहतवादाची नवी व गुंतागुंतीची प्रक्रिया जाणून घेण्याची त्यांची कुवत नव्हती. त्यासाठी बुद्धीजीवी विचारवंत वर्गाची गरज होती. १९३७ नंतर काँग्रेसने शेतकरी चळवळींना काँग्रेसमध्ये सामावून घेण्याचा व आपल्या चळवळीला पाठींबा मिळवण्याचा प्रयत्न केला. या चळवळींचा प्रादेशिक विस्तार मार्यादित असला तरी वेगवेगळ्या प्रांतात अवलंविण्यात आलेले चळवळीचे मार्ग साधारणतः सारखेच होते. स्वातंत्र्य चळवळीच्या शेवटच्या कालखंडात शेतकरी चळवळ व स्वातंत्र्य चळवळ नेहमी एकमेकींवर आधारित होत्या. शेतकरी चळवळीने राष्ट्रवादी भूमिका स्वीकारल्यामुळे राष्ट्रीय जागृती शहरापासून खेड्यापर्यंत जाऊन पोहोचली.

# घटक २ : मुक्ती चळवळ

## कामगार चळवळ

### प्रास्ताविक

इंग्रज राजवटीत साधारणपणे १८५० ते १८७० दरम्यान येथे कापड लोखंड पोलाद कोळसा रसायने सिमेंट ताग साखर असे आधुनिक उद्योग सुरु होऊन त्यांचा विकास होऊ लागला. भारतात गुंतवणूक केल्यास उत्पादन खर्च कमी लागतो व स्वस्तात मजूर मिळत असल्याने नफा अधिक मिळणार म्हणून इंग्रज मोठयाप्रमाणावर भारतात गुंतवणूक करू लागले. शेती उद्योगाशी संबंधित उद्योगधंद्यांकडेही इंग्रजांनी लक्ष दिले होते.रेल्वेच्या विस्तारामुळे उद्योगधंद्यांचाही विकास झाला. १८५४ मध्ये मुंबईत पहिली कापड गिरणी व १८५५ मध्ये बंगालात तागाची गिरणी सुरू झाली.यानंतर पन्नास वर्षात भारतात ठिकठिकाणी कापड ज्यूट व कोळसा इ.उद्योग विकसित होऊन त्यात हजारो मजूर काम करू लागले. उद्योगांच्या विस्ताराबरोबरच कामगारांची संख्याही मोठयाप्रमाणावर वाढू लागली. कामगार मजूर वाढीबरोबरच मजूर विषयक प्रश्नही निर्माण होऊ लागले.पण उद्योगपती कारखानदार व मील मालकांनी त्याकडे दुर्लक्ष केले.सरकारही काही हालचाल करत नव्हते.

### कामगारांचे प्रश्न

भारतीय मजूरांची स्थिती अत्यंत दयनीय होती.त्यांना अनिश्चित व अपुरे वेतन मिळत असे.कामाची ही खात्री नव्हती.भांडवलदारांकडून त्यांचे शोषण होत असे.अस्वच्छ जागेत अनिश्चित काळ त्यांना काम करावे लागे.शिवाय न पेलवणारा कामाचा बोजा त्यांच्यावर टाकला जाई.मजूरांना कुठल्याही वैद्यकीय सुविधा वा आठवडयास सुट्टी दिली जात नसे.त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचीही सोय नसे.त्यामुळे निरक्षरता आजारपण व कर्जबाजारीपणा यात कामगार भरडला जात असे.शिवाय बालमजूरांचाही प्रश्न होताच.थोडक्यात अनेक कारणांनी कामगारांची स्थिती दयनीय होती.

### कामगारांमध्ये जागृती व लढ्याची सुरुवात

साधारण १८७५ मध्ये सोराबजी शापुरजी नेतृत्त्वात सुरु जालेली कामगार चळवळ विस्तारली नसली तरी चळवळीला सुरूवात झाली. कामगारांच्या राहणीमानाच्या समस्या सोडविल्या जाव्यात असे त्यांना वाटत होते. त्यातून कामगारांमध्ये वाढू लागलेला असंतोष १८७५ पासून संपाच्या रूपाने बाहेर पडू लागला. त्यामुळे १८७५ मध्ये पहिला आयोग नेमण्यात आला. महात्मा फुले यांनी 'मुंबई मजूर संघ' (१८७९) स्थापून कामगार प्रश्नात लक्ष घालत महाराष्ट्रात कामगार चळवळ सुरु केली. बंगालात शशीपाद ब^नर्जीनी कामगार मंडळ स्थापन

करून ‘भारत श्रमजीवी’ या मासिकाचे प्रकाशन सुरू केले होते. यानंतर अनेक संघटना पुढे येऊ लागल्या. १८८० ते ९० मुंबई मद्रास औद्योगिक क्षेत्रात २५ मोठे संप झाले व कामगार बळ वाढतच गेले.

महात्मा फुले यांचे शिष्य नारायण मेघाजी लोखंडे यांनी १८९० मध्ये मुंबई येथे गिरणी कामगारांची पहिली मोठी संघटना स्थापन केली व कामगार चळवळीचा पाया घातला. नारायण मेघाजी लोखंडे यांना कामगार चळवळीचे जनक मानले जाते. कामगारांचे शोषण लक्षात घेऊन कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी कामगारांची पहिली संघटना ‘बा^म्बे मिल ह^न्ड असोसिएशन’ स्थापन केली. गिरणी कामगारांना रविवारी सुट्टी मिळावी यासह लोखंडे यांनी अनेक मागण्या केल्या. त्यासाठी संप घडविला. त्यांच्या कार्यामुळे १८९० मध्ये रविवार सुट्टीचा दिवस म्हणून घोषित झाला.कामगार प्रश्नासाठीच्या रॉयल कमिशन पुढे प्रश्न मांडले. कामगार कल्याणासाठी सातत्याने संघर्ष केला. सरकाने त्यांचा रावबहादुर किताब देऊन गौरव केला. १८८१ मध्ये भारतातील कारखान्यासंबंधी कायदा झाला होता लोखंडे यांच्या प्रयत्नांनी पुढे बालकामगार विषयक तरतुदींचा पहिला फॅक्टरी अॅक्ट १८८४ मध्ये पास झाला. स्त्री कामगार विषयक फॅक्टरी अॅक्ट १८९१ मध्ये आला यानंतर कामगार प्रश्न विषयक जाणीव व लढा अधिक विस्तारत जाऊन आर्थिक, सामाजिक व राजकीय स्तरावर कामगार चळवळ विस्तारत गेली.

### १९२० नंतरची कामगार चळवळ

१९१७ मध्ये रशियात क्रांती झाली आणि जगभर कामगार चळवळीला गती मिळाली. तशी भारतातील कामगार चळवळही वाढू लागली. १९२१ मध्ये वा^शिंग्टनला आतंरराष्ट्रीय मजूर परिषद झाली.या परिषदेच्या शिफारशीनुसार १९२२ मध्ये नवा कायदा करण्यात आला.या कायद्यानुसार बालमजुराचे किमान वय ९ वरून ११ करण्यात आले.कामाचे तास विश्रांतीसह सहा ठरविण्यात आले.तर प्रौढांसाठी कामाचे तास ११ करण्यात आले.साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक केले.जादा कामाचा वेगळा मोबदला दयावा व कामावर असताना दुखापत झाल्यास नुकसानभरपाई दिली जावी असे निश्चित केले.१९३६ मध्ये खाण कायदा पास करण्यात आला.या कायद्याने खाण कामगारांना अनेक सवलती दिल्या.

१९४७ मध्ये कारखानदार मजूर यांच्यात वाढत्या वादामुळे प्रश्न सामोपचाराने सोडविण्यासाठी ‘औद्योगिक विवाद कायदा’ पास करण्यात आला.वाद सोडविण्यास कार्यक्षम यंत्रणा उभारण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारवर सोपविण्यात आली.त्यासाठी दोघांची अधिकारक्षेत्रे निश्चित केली.प्रश्न निर्माण केलेल्या समितीकडे न सुटल्यास औद्योगिक न्यायालय किंवा बोर्ड आ^फ कन्सिलीएशनकडे सोपवावेत असे ठरले.पुरेशा पूर्व सूचनेअभावी

संप बेकायदेशीर ठरविण्याचा सरकारला अधिकार देण्यात आला.१९४८ मध्ये किमान वेतन कायदा करून असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे शोषण थांबविण्यास पाऊल उचलले.किमान वेतन निश्चितीचा अधिकार राज्य सरकारला दिला.१९४८ मध्ये पास करण्यात आलेल्या फ^क्टरी अ^क्टने आठवडयास कामाचे तास ४८ निश्चित करत एक दिवस पगारी सुट्टी आवश्यक केली.५०पेक्षा जास्त स्त्रियां जेथे काम करतात तेथे बालसंगोपन गृह आवश्यक केले.मुले व स्त्रीयांना रात्रपाळीस ठेवु नये असे ठरले.१९४८ मध्येच द एम्प्ला^इज स्टेट इन्शुरन्स ॲक्ट पास करण्यात आला.आजारपण बाळांतपण अपंगत्व व अश्रीत यासाठी विमा तरतुद करण्यात आली.त्यासाठी केंद्रिय विमा मंडळ स्थापन करून त्यावर ही जबाबदारी टाकली.

## कामगार संघटना

लोखंडे यांनी स्थापन केलेल्या संघटनेनंतर भारत ब्रह्मदेश रेल्वे कर्मचारी संयुक्त संघटना (१८९७), कलकत्ता छापखाना संघ (१९०५), मुंबई डाक कर्मचारी संघ (१९०९), कामगार हितवर्धक सभा (१९१०) अशा अनेक संघटना १९२० पूर्वी स्थापन झाल्या होत्या. १९१८ मध्ये महात्मा गांधीनी 'अहमदाबाद टेक्सटाईल लेबर असोसिएशन' संघटना केली त्याचे १४००० लोक सभासद झाले.या संघटनेने कामगारांना मोठी वेतनवाढ मिळवुन दिली होती.

पहिल्या महायुद्धकाळात कामगार प्रश्न गंभीर झाले आणि कामगार संघटनाही मोठयाप्रमाणावर वाढू व बलाढय होऊ लागल्या. ७ जुलै १९२० रोजी नारायण जोशी यांनी अनेक कामगार नेत्यांच्या मदतीने 'अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेस' स्थापन केली.या संघटनेचे पहिले अधिवेशन ३१ ऑक्टोबर १९२० रोजी लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेत झाले.या अधिवेशनास अनेक राजकीय नेतेही उपस्थित होते.देशभरातील कामगार संघटनांच्या कार्यात व ध्येयधोरणात सुसूत्रता आणण्यासाठी भारतीय पातळीवर कामगार संघटन केले पाहिजे यासाठी या संघटनेने प्रयत्न केले.६४ कामगार संघटना व १४०८५४ कामगारांना या संघटनेने स्वत:शी संलग्न करून घेतले.यानंतर अनेक व्यावसायिक संघटना स्थापन होऊन संप वा विविध मार्गांनी लढा व्यापक होत चळवळ बलाढय होऊ लागली.

१९२३ मध्ये श्री डांगे व केशवराव जोगळेकर यांनी 'हिंदुस्थान लेबर सोशालिस्ट पार्टी' स्थापन केली पण तिचा फार विस्तार होऊ शकला नाही.१९२९ मध्ये 'अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेस' मध्ये साम्यवाद्यांमुळे फुट पडली.साम्यवाद्यांनी 'भारतीय ट्रेड युनियन फेडरेशन' स्थापन केली तर १९३१ मध्ये डाव्यांनी 'अखिल भारतीय लाल ट्रेड युनियन कॉंगेस' स्थापन केली.कामगारांमध्ये समाजवादाचा प्रसार करून लढाऊ कामगार संघटना उभारण्याचे कार्य साम्यवादी नेत्यांनी केले.त्यात श्रीपाद अमृत डांगे मुझ्झफर अहमद यांचे योगदान मोलाचे होते.

१९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. अीटूछ वर समाजवाद्यांचे वर्चस्व होते.त्यांनी अलिप्ततेचे धोरण स्विकारले होते.१९४७ मध्ये 'भारतीय राष्ट्रीय ट्रेड युनियन काँग्रेस' (ीण्टूछ) स्थापन झाली. स्वतंत्र भारतात मजूरांना प्रतिनिधीत्व देणा–या या संस्थेने बरेच भरीव कार्य केले आहे.जागतिक कामगार संघटनेनेही इंटकला मान्यता दिली.

स्वातंत्र्यानंतर समाजवादी कॉंग्रेसमधून बाहेर पडले व त्यांनी समाजवादी पक्ष स्थापन केला.कामगार संघटनासाठी त्यांनी 'हिंद मजदुर पंचायत' स्थापन केली.पूर्वीची 'इंडियन फेडरेशन आ^फ लेबर' त्यात विलिन केली. हिंद मजदुर सभा व आयटक मधून फुटून निघालेल्यांनी १९४९ मध्ये 'युनायटेड ट्रेड यनियन काँग्रेस' स्थापन केली.

ीण्टूछ अीटूछ ञ्श् ूटूछ या चार संघटनांनी कामगार चळवळीला ख–या अर्थाने पुढीलकाळात दिशा दिली.

## स्वातंत्र्य चळवळीतील कामगारांचा सहभाग

स्वत:च्या प्रश्नाबद्दल कामगारांमध्ये जागृती होत असताना राष्ट्रीय जागृतीही होत होती.१९०८ मध्ये टिळकांना अटक झाली तेव्हा मुंबईच्या कामगारांनी उत्स्फूर्त संप केला होता.पंजाबातील दडपशाही व महात्मा गांधीजींना झालेल्या अटकेवरून एप्रिल १९१९ मध्ये अहमाबादच्या कामगारांनी संप करून आंदोलन केले.१९१९ ते १९२१ काळात रेल्वे कामगारांनी रौलट कायद्याविरोधात चळवळ केली. असहकार व खिलाफत चळवळीच्या पाठिंब्यासाठी हरताळ केला. नोव्हेंबर १९२१ मध्ये प्रिन्स आ^फ वेल्सच्या भारत भेटीवर बहिष्कार टाकण्याच्या काँग्रेसच्या आवाहनानुसार कामगारांनी संप केला. मुंबईतील १४०००० कामगारांनी हरताळ पाळला. सविनय कायदेभंग चळवळीतही कामगारांचा सहभाग होता. सोलापूर गिरणी कामगार, कराचीतील गोदी कामगार, कोलकाता वाहतूक व गिरणी कामगार व मद्रासच्या गिरणी कामगारांनीही या लढयास आपले योगदान दिले. ४ फेब्रुवारी १९३० रोजी जीआयपी रेल्वेच्या २०००० कामगारांनी हरताळ पाळला. २ आ^क्टोबर १९३९ रोजी युद्धविरोधी निदर्शनात कामगार संघटना आघाडीवर होत्या. चले जाव चळवळीतही अनेक ठिकाणी कामगारांनी संप करून योगदान दिले. १९४६ मध्ये मुंबईत झालेल्या नाविक उठावास संप करून कामगारांनी पाठिंबा व्यक्त केला. थोडक्यात स्वहक्कांसह राष्ट्रीय जाणीवाही कामगारांमध्ये विकसित होताना दिसतात.

## समारोप

मर्यादित सभासद असमान वाढ कामगार संघटना आकार लहान पैसा कमी अल्प उत्पन्न भरती सदोष व्यवस्थापन प्रवृत्ती बाह्य नेतृत्त्व ऐक्य अभाव मतभेद निरक्षरता

राजकीय पक्षांचा स्वार्थ व कामगारांची उदासीनता असे कामगार चळवळीचे अनेक दोष असले तरी उपरोक्त आढाव्यावरून कामगार चळवळीचा भारतातील विकासाची आपणास माहिती मिळते.

# घटक २ : मुक्ती चळवळ

## स्त्रियांची चळवळ

**प्रास्ताविक**

भारतीय संस्कृतीत मातृदेवता म्हणून स्त्रियांचा गौरव होत असला तरी पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले होते.मनुस्मृतीतील 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हती' वचना नुसार स्त्रियांना स्वातंत्र्य न देता त्यांच्यावर बंधने लादली गेली होती.पुढे पाश्चात्य शिक्षण, संस्कृतीचे ज्ञान त्यातून आलेली व्यापकदृष्टी उदारमतवाद, मानवतावाद, स्वदोषांची झालेली जाणीव यामुळे स्त्रियांच्या समस्यांची जाणीव सुधारणांचे प्रयत्न सुरू झाले.वर्षानुवर्षाच्या दास्यातून स्त्रियांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या.या समस्यांमधून बाहेर पडत माणूस म्हणून जगण्याचा समान अधिकार मिळवण्यासाठी स्त्री मुक्ती चळवळ येथे विकसीत होत गेली.या स्त्री मुक्ती चळवळीचा आढावा पुढीलप्रमाणे...

**स्त्रियांचे प्रश्न**

मुलगाच पाहिजे या अट्टाहासातून मुलगी झाल्यास तीला मारण्यात येत असे या बालिका हत्यांचे प्रमाण राजस्थान भागात मोठया प्रमाणावर होते.मुलींचा विवाह अल्पवयीन असतानाच करण्यात येत असे.बऱ्याचदा पाळण्यात असतानाच असे विवाह होत असत.मुलीपेक्षा बरेचदा वराचे वय खुप अधिक असे त्यास जरठबालाविवाह म्हणतात.एक पत्नी जीवंत असतानाच अधिक विवाह करण्याची बहुपत्नीकत्वाची प्रथाही रूढ होती.पतीच्या निधनानंतर सती जाण्याची आमानुष प्रथाही अस्तित्वात होती.विधवांचे जीवन अत्यंत दु:खमय असे.त्यांना पुनर्विवाहाची परवानगी नसे.त्यांना कुरूप करण्यासाठी त्यांच्या डोक्याचे मुंडण म्हणजेच केशवपन करण्यात येत असे.विधवांना मुल झाल्यास त्यांना मारून टाकत.स्त्रियां शिक्षणांपासूनही वंचित होत्या.स्त्रियांना आर्थिक अधिकारही नव्हता.अशा अनेक समस्यांसह स्त्री चूल आणि मूल या चौकटी अनेक अमानुष रूढी, प्रथा, परंपरासंह कैद झाली होती.

**सुधारणांसाठी प्रयत्न**

तिला या चौकटीतून काढल्याशिवाय तिला सामाजिक जीवनात आणल्याशिवाय तिच्या समस्या सोडविल्याशिवाय देशाची प्रगती अशक्य असल्याची जाणीव निर्माण होऊ लागली.त्यातून अनेक सुधारक व संस्था पुढे आल्या.त्यांनी स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावला पाहिजे ही जाणीव निर्माण केली.स्त्री सुधारकही पुढे आल्या व स्त्रिया बंधमुक्त होऊ लागल्या.आपल्या क्षमतेनुरूप त्यांनी विविध क्षेत्रात योगदान देत आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा उचलला.

## शिक्षण प्रसार, आर्थिक स्वावलबित्व व अनिष्ट प्रथांना विरोध

राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, दीनबंधू, लोकहितवादी,स्वामी दयानंद सरस्वती यांच्यासह अनेक सुधारकांनी घातक प्रथांना विरोध केला. विविध कायदेही यादृष्टीने महत्त्वाचे ठरले. १९ व्या शतकाच्या मध्यावर स्त्री शिक्षणविषयक जाणीव व्यापक झाली. त्यासाठी मिशनरी व सुधारकांनी प्रयत्न केले. महात्मा फुले, ईश्वस्रचंद्र विद्यासागर यांचे काम बहुमोल आहे. आर्य समाज, प्रार्थना समाज व डेक्कन एज्युकेशन सोसायटीने याबाबत कार्य केले. सर सय्यद अहमद खान यांनी मुस्लिम स्त्रियांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी स्वतंत्र संस्था स्थापन केली. साधारण १९२० नंतर स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर होऊ लागला. स्त्रियांना मालमत्तेचा हक्कही नव्हता.त्यांच्या आर्थिक परावलंबित्वामुळे त्यांचे जीवन अधिकच समस्याग्रस्त बनले होते.स्त्रियांना आपल्या पतीच्या मालमत्तेत त्याच्या उपरांत वाटा मिळावा यासाठी प्रयत्न सुरू झाले.अखेर काही अटी वर त्यांचा मालमत्तेवरील हक्क १९३७ मधील कायद्याने मान्य करण्यात आला.

## सुधारकांचे योगदान

भारतात स्त्रियांचे अनेक प्रश्न होते.इंग्रजांनी ते सोडविण्यासाठी कायदे केले.परंतु केवळ कायदे करून हे प्रश्न सुटणे शक्य नव्हते.या सुधारणांसाठी लोकजागृती करणे व कायदा करण्यासाठी सरकारला योग्य पाश्र्वभूमी निर्माण करून देणे याबरोबरच मानसिकता बदलविण्याचे अवघड कार्य अनेकांनी केले. १९२० पूर्वी राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, महात्मा फुले, विष्णुशास्त्री पंडित, न्या.महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर यासह अनेक सुधारकांचे योगदान मोठे होते. स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक सुधारक पुढे आले.त्यामध्ये अनेक स्त्रियांचाही समावेश होता. १९२० पूर्वी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, डॉ आनंदीबाई, तर्खडकर, ताराबाई शिंदे यांचे स्त्री मुक्ती चळवळीतील योगदान फार मोलाचे आहे. अनेक संस्था संघटना सुधारक विचारवंत व वृत्तपत्र यांच्या कार्यामुळे स्त्री जीवनातील सर्व समस्या संपल्या नसल्या तरी जाणीव जागृती हक्क जाणीव स्त्री शक्तीची प्रचीती आली.बंधमुक्तीच्या प्रक्रियेला सुरूवात झाली.

१९२० नंतर महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे स्त्री सुधारणाविषयक कार्य फार मोलाचे आहे. त्यांनी महिला विद्यालाय व महिला विद्यापीठाची स्थापना करून स्त्री शिक्षण प्रसारात मोलाचे योगदान दिले.याशिवाय शशिपाद ब^नर्जी, वीरेशलिंगम पंतलू अशा अनेक सुधारकांचे योगदान ही मोलाचे आहे. सुधारकांच्या या कार्यामुळे स्त्रियांची स्थिती एकदम जरी सुरधारली नसली तरी कीमान पुरक परिस्थिती निर्माण झाली.

## स्त्री मुक्ती चळवळीतील संघटना

आर्य महिला समाज, आत्मनिष्ठ युवती संघ, शारदा सदन, करमणूक क्लब, हिंदु महिला सभा अशा अनेक संघटनांनी स्त्री मुक्ती चळवळीत मोलाचे योगदान दिले. १९२० नंतर देशसेविका संघ, हिंदुस्थानी सेविका दल, स्त्री सेविका संघ अशा अनेक संघटनांनी हे कार्य पुढे चालू ठेवले. देशसेविका संघ महात्मा गांधींच्या प्रेरणेने सुरु झाला होता. सविनय कायदेभंग चळवळीत या संघाचा मोलाचा सहभाग होता. १९३१ मध्ये सरकारने या संघटनेवर बंदी घातली. ना.सु.हर्डीकर यांनी हिंदुस्थानी सेविका दल स्थापन केले होते कल्याणी सय्यद त्याच्या अध्यक्ष होत्या. सरकारने या दलावरही बंदी घातली होती. १९१७ ते १९२७ याकाळात महिलांची भारतीय संघटना, भारतीय स्त्रियांचे राष्ट्रीय मंडळ व अखिल भारतीय महिला परिषद या तीन महत्त्वपूर्ण राष्ट्रीय संघटना उदयास आल्या.

महिलांची भारतीय संघटना मार्गारेट कझिन्स यांनी अॅनी बेझंट यांच्या साथीने स्त्रियांची स्थापन केली. त्यांनी धर्म शिक्षण राजकारण व लोकोपचार या क्षेत्रात काम केले. 'स्त्रीधर्म' हे मासिक चालविले. स्त्री मताधिकाराचा पुरस्कार केला. भारतीय स्त्रियांचे राष्ट्रीय मंडळ ची स्थापना मुंबई येथे मेहेरबाई टाटा यांनी केली. पडदा पद्धत जातीभेद व निरक्षता या तीन दोषांविरोधात या संघटनेने काम केले. मार्गारेट कझिन्स यांच्या प्रयत्नातून अखिल भारतीय महिला परिषद स्थापन झाली. शिक्षण प्रसार व अन्य अनिष्ट प्रथा विरोधात या परिषदेने काम केले.

**स्वातंत्र्य चळवळ व स्त्रियांचा सहभाग**

राष्ट्रीय सभेने स्त्री सुधारणाविषयक कार्य केले. अनेक स्त्रियांचा सभेत सहभाग होता.हा सहभाग दिवसेंदिवस वाढत गेला. सुरूवातीस केवळ उच्च कुटुंबातील स्त्रियांचा सहभाग होता. पुढे सर्वच स्तरातील स्त्रियांचा सहभाग वाढला.

१९२० मध्ये सभेचे नेतृत्त्व गांधीजींकडे आले.त्यांनी राजकीय कार्यात स्त्रियांना सहभागी करून घेतले त्यामुळेही स्त्रियांमध्ये जागृती घडून आली.स्त्रियांमध्ये आत्मविश्वास वाढून सामाजिक व राजकीय जीवनात त्या पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होऊ लागल्या.शोषणा विरूध्द लढण्यास त्या सिध्द झाल्या.गांधीजींच्या चळवळीत स्त्रियां मोठया संख्येने सहभागी झाल्या.त्या निर्भय बनल्या.कस्तूरबा, वासंतीदेवी दास (सी.आर.दास यांच्या पत्नी, १९२१ मध्ये सत्याग्रह नेतृत्त्व व १९२२ मध्ये प्रांतिक काँग्रेस अध्यक्ष), उर्मिलादेवी, इंद्रप्रभा मुजुमदार, राधादेवी (लाला लजपत राय पत्नी पंजाबात कार्य), पार्वतीदेवी, स्वरूपराणी (पंडित नेहरू यांची आई, संयुक्त प्रांतात कार्य), कमलादेवी चटटोपाध्याय (वुमेन लीग फाॅर पीस अॅंड फ्रिडम प्राग), हंसाबेन मेहता(आॅनररी मॅजीस्ट्रेट पद त्याग सत्याग्रह सहभाग), सरोजीनी नायडू (१९२५कानपूर काँग्रेस अध्यक्ष धारासाण सत्याग्रह), अरूणा असफअली(इन्कलाब पत्रक,१९४२

भूमिगत), सुचेता कृपलानी, उषा मेहता यांचे स्वातंत्र्य लढयातील कार्य महत्त्वपूर्ण ठरले.निवेदिता (पंजाब क्रांतीकारकास मदत), सुशीलादेवी( बंगाल क्रांतीकारकास मदत), खुर्शिदबेन, कामा(स्टटगार्ट आंतरराष्ट्रीय परिषद), बीना दास (कलकत्ता विद्यापीठात ग.स्ट^न्ले ज^कसन), प्रीतीलता वड्डेदार, कल्पना दत्त, शांती घोष, सुनीती चौधरी(कलेक्टर सिव्हन) यांचा क्रांतीकार्यात उल्लेखनीय सहभाग होता.क^.लक्ष्मी स्वामीनाथन यांचे आझाद हिंद सेनेतील कार्य महत्वपूर्ण आहे.

**समारोप**

भारतीय स्त्रियांनी दीर्घकाळ अनिष्ट परंपरा व धारणा विरोधात लढा दिला. सुरुवातीस केवळ सुधारणांपुरती मर्यादित असलेली चळवळ विस्तारत गेली. स्त्रियांचा सार्वजनिक क्षेत्रातील वावर वाढत गेला. तशा स्त्रियांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग वाढून पुरुषांप्रमाणे स्वातंत्र्यासाठी त्यांनी ही योगदान दिले. स्वातंत्र्य मिळाल्यावर आधुनिक स्त्रीवादी चळवळीचा विकास ही येथे घडून आला. थोडक्यात भरतील स्त्री मुक्तीची चळवळ विविध टप्प्यातून विकसित होत गेली.

# घटक २ : मुक्ती चळवळ

## दलित चळवळ

### प्रास्ताविक

दलित म्हणजे केवळ अनुसूचित जाती जमातीतील लोक नसून सर्व शोषित हे दलित म्हणून ओळखले जातात. दलित हा शब्द जातिवाचक किंवा कालचा शोषित व आजचा संघर्षशील या अर्थानेही वापरला जातो. तर अनेकजण सामाजिक व आर्थिकदृष्टया दुर्बल असणाऱ्यांना दलित मानतात. भारतीय समाज विविध जाती व उपजातीत विभागला होता. जातीत श्रेष्ठ कनिष्ठता मानली जात होती. कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीतील माणसांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार ही मिळत नव्हता. अशा वंचित वर्गासही दलित मानले जाई.जातीयता हा भारतीय समाजाला लागलेला मोठा कलंक होता.

१९ व्या शतकाच्या अखेरीस काही सुधारकांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य हाती घेतले होते. ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, थिओसा^फीकल सोसायटी सुधारक संस्थांनी जातीप्रथा निर्मूलनासाठी प्रयत्न केले. महात्मा फुले,, राजर्षी शाहू, महाराज, महर्षी शिंदे,, महाराज सयाजीराव गायकवा, डॉ आंबेडकर यांनी दलित चळवळीला दिशा देत नेतृत्त्व केले. गांधीजींनी १९३५ मध्ये हरिजन सेवक संघ स्थापन केला.दलितांसाठी प्राथमिक शाळा सुरू करणे दलित विद्याथ्र्यांना शिष्यवृत्ती देणे त्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी विहिरी खोदणे इ.कामे या संघाने केली.म.गांधीजींनी दलितांना मदतीचा हात देत सवर्णांचे मतपरिवर्तन घडवून आणून दलितांवरील अन्याय दूर करण्यासाठी आपल्या चळवळीचा उपयोग केला.मानवता व राष्ट्रीय ऐक्य या दोन्ही दृष्टीकोनातून दलितांना न्याय दिला पाहिजे असे वाटून येथे दलित चळवळ प्रबळ होत गेली. भारतीय समाजात उपेक्षित शोषित पीडीत व पददलित जनतेच्या उद्धारासाठी सुरू करण्यात आलेली चळवळ म्हणजे दलित चळवळ होय. १९२० पूर्वीच्या सुधारक व नेत्यांचे दलित चळवळीत मोलाचे योगदान आहे. त्यांच्या पायाभरणीमुळेच १९२० नंतर दलित चळवळ येथे फार जोमाने वाढली. १९२० नंतरच्या दलित चळवळीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे...

### दलित चळवळ व डॉ बाबासाहेब आंबेडकर

१९२० पासून डा^.आंबेडकरांनी दलित चळवळीचे नेतृत्त्व करण्यास सुरूवात केली.दलित समाजाला आत्मसन्मानाचा मार्ग दाखविण्यास आंबेडकरांनी कार्य केले.१९२४ मध्ये बहिष्कृत

हितकारीणी सभेचे त्यांनी पुनरूज्जीवन केले.दलितांसाठी वाचनालय दलितांना आर्थिक मदत कर्जाऊ रकमा सवलतीच्या दरात विद्याथ्र्यांसाठी क्रीडा मंडळे सहकारी मंडळे सवर्णासाठी समता संघाची स्थापना केली.सावर्जनिक स्थळे मंदिरे दलितांना खुली करण्यासाठी वेगवेगळी आंदोलने केली.

### १) महाडचा सत्याग्रह

कुलाबा जिल्*यातील महाड येथील चवदार तळयावळ दलितांना पाणी भारण्यास मज्जाव होता.या तळयाच्या पाण्यावर दलितांचाही हक्क आहे याची जाणीव सर्वांना करून देण्यासाठी १९२७ मध्ये सत्याग्रह करून आंबेडकरांनी हा हक्क मिळवुन दिला.

### २) मनुस्मृती दहन

मनुस्मृती या ग्रंथात जन्माधिष्ठीत वर्णव्यवस्थेचे समर्थन केले होते.या ग्रंथाचा व अशा व्यवस्थेचा प्रतिकात्मक निषेध करण्यासाठी डा^.आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे जाहीरतित्या दहन केले.

### ३) मंदिर प्रवेश

मंदिर प्रवेशाचा आमचा हक्क मान्य झालाच पाहिजे म्हणून डा^.आंबेडकरांनी नाशिक येथे २ मार्च १९३० रोजी काळाराम मंदिर सत्याग्रह केला.असेच सत्याग्रह अनेक ठिकाणी होऊन गावोगावच्या मंदिरांमध्ये प्रवेशाबाबत असलेले निर्बंध दूर झाले.

### ४) शिक्षण प्रसार

अस्पृश्यांच्या शिक्षण प्रसाराकडेही डा^.आंबेडकरांनी लक्ष दिले.बहिष्कृत हितकारिणी सभेच्यावतीने दलितांसाठी वाचनालये रात्रशाळा सुरू केल्या.१९४६ मध्ये पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.या संस्थेच्यावतीने मुंबईत सिद्धार्थ का^लेज व औरंगाबाद येथे मिलिंद का^लेज स्थापन केले.

### ५) वृत्तपत्रे

वृत्तपत्रांच्या माध्यमातून चांगली लोकजागृती करता येते म्हणून शाहू महाराजांच्या मदतीने 'मूकनायक' नावाचे त्तपत्र सुरू केले.१९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' व १९२८ मध्ये 'समता' व त्यानंतर 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' ही त्तपत्रे सुरू केली.

### ६) राजकीय जागृती

डा^.आंबेडकरांनी गव्हर्नर मंडळात काम करताना दलित कल्याणाच्या दृष्टीने विचार मांडले.तसेच दलितांना राजकीय हक्क मिळवुन देण्यासाठीही त्यांनी मोलाचे कार्य केले.विधीमंडळात व शासकीय सेवांमध्ये पुरेशा जागा मिळाव्यात यासाठी गोलमेज परिषदेत

आंबेडकरांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली.र^म्से म^कडोनाल्डच्या जातीय निवाडयात ही मागणी मान्य होऊन दलितांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आला.परंतु अशा मतदारसंघामुळे हिंदुमध्ये तणाव व फुट निर्माण होईल म्हणून गांधीजींनी उपोषण केले.त्यामुळे डा^.आंबेडकर व म.गांधी यात चर्चा होऊन पुणे करार झाला. या करारानुसार आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी सोडून दिली.प्रांतिय विधीमंडळात आणि केंद्रिय विधीमंडळात दलितांसाठी १८ टक्के राखीव जागा असाव्यात असे ठरले.त्यानुसार १९३७ मध्ये झालेल्या निवडणूकांमध्ये अनेक दलित लोक काँग्रेसच्या माध्यमातून निवडून आले.समान राजकीय अधिकार आत्मनिर्भयतेची भावना वाढावी यासाठी आंबेडकरांनी देशभरातील दलित जनतेला संघटित केले.

### ७) बहिष्कृत हितकारीणी सभा

२० जुलै १९२४ रोजी आंबेडकरांनी बहिकृत हितकारीणी सभा ही संस्था स्थापन केली.शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते.अस्पृश्यांसाठी शिक्षणाचा प्रचार मोफत वाचनालये आर्थिक सुधारणा घडविणे ही ध्येये होती.

### ८) स्वतंत्र मजूर पक्ष

१९३६ मध्ये आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.दलित वर्गाचे संघटन करून त्यांनी या पक्षाची स्थापना केली.कायद्याच्या आधारे सुधारणा घडवुन आणणे शेतकरी मजूर दलित अशा लोकांना संघटित जागृत करणे हे पक्षाचे उद्दिष्ट होते.१९३७ च्या निवडणुकीत प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकांमध्ये १५ पैकी १३ जागा बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या मजूर पक्षाने जिंकल्या.

### ९) अखिल भारतीय शेडयुल कास्ट फेडरेशन

१९४२ मध्ये डा^.बाबासाहेब आंबेडकरांनी हा राजकीय पक्ष स्थापन केला. दलित समाजाला संघटित करून अन्याया विरूद्ध लढा दयायला प्रत्त करण्यावर त्यांनी भर दिला.१९४६ च्या निवडणुकांमध्ये ३५जागांपैकी १२ उमेदवारांनी विजय मिळविला.

### १०) भारतीय रिपब्लिकन पक्ष

डा^.आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दिक्षा घेतल्यानंतर या नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली.मात्र डा^.आंबेडकरांच्या निधनानंतर त्यांच्या अनुयायांनी या पक्षाची स्थापना केली.हा पक्ष म्हणजे भारतीय रिपब्लिकन पक्ष होय.जातीविरहीत धर्मविरहीत रिपब्लिकन पक्ष स्थापन करून देशात सामाजिक तसेच आर्थिक क्रांती घडवून आणण्याची ही सुरूवात होती.पुढे दलित पँथर सह अनेक पक्ष संघटनांनी दलित चळवळीस पुढे नेले आहे.

अर्थात दलितोद्धाराच्या चळवळीत म.फुले कृष्णराव भालेकर राजर्षी शाहू महाराज महाराज सयाजीराव गायकवाड महर्षी शिंदे गोपाळबाबा वलंगकर शिवराम जानबा कांबळे गणेश गवई कालिचरण गवई किसन बनसोड म.गांधी अशा अनेक नेत्यांसह अनेक संस्थां पक्ष व त्तपत्र यांचे व विशेषत: डा^.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान फार मोलाचे आहे.

# घटक २ : मुक्ती चळवळ

## आदिवासी चळवळ

### प्रास्ताविक

आदिवासी म्हणजे त्या ठिकाणचे मूळ रहिवासी किंवा डोंगर अथवा जंगलाच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना आदिवासी म्हणतात. भारतात आदिवासींच्या चारशे पेक्षा जास्त जमाती विविध भागात वास्तव्य करतात. आदिवासी लोकसंख्या भारतात ६.९ तर महाराष्ट्रात ९.५ आहे. मध्यप्रदेश ओरिसा बिहार प.बंगाल गुजरात राजस्थान महाराष्ट्र व ईशान्य भारतात प्रामुख्याने त्यांचे वास्तव्य आहे. इशान्य भारतात आदिवासी बहुसंख्येने असून इतर राज्यात ते अल्पसंख्य आहेत. आपली संस्कृती भाषा व चालीरीती जपणे जोपासणे याबाबत या जमाती विशेष संवेदनशील आहेत व होत्या. ब्रिटिशांची राजवट या देशात स्थापन झाल्यानंतर त्यांच्याकडून होणाऱ्या अन्यायाचा आदिवासी समाजाने विरोध केला. आदिवासींच्या चळवळी दोन प्रकारच्या होत्या. एक म्हणजे त्यांचे शोषण करणारे जे वर्ग होते त्यांच्याविरुद्ध चालवलेली चळवळ. त्या वर्गात जमीनदार, सावकार, व्यापारी, ठेकेदार, सरकारी अधिकारी व ख्रिश्चन मिशनरी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. आदिवासींची दुसरी चळवळ ही भारताच्या स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत होती. आदिवासी जमाती, जमीनदार, सावकार, व्यापारी, ठेकेदार यांना परकीय समजत होत्या.

### आदिवासींचे प्रश्न

भारतात इंग्रज सत्ता स्थापन झाली व या सत्ताकारणात राजकीय आर्थिक वर्चस्व स्थापताना येथील समाजव्यवस्था रूढी परंपरा व संस्कृती यांनाही धक्का दिला.त्यातून आदिवासीही सुटले नाही.आदिवासी जमाती स्वातंत्र्यप्रिय होत्या.त्यांची स्वत:ची संस्कृती होती.येथे अनेक सत्तातंरे झाली पण आदिवासी जीवनशैली व संस्कृती आबाधित होती.परंतु इंग्रजांच्या विस्तारवादामुळे ही संस्कृती धोक्यात आली.पारतंत्र्य काळात आदिवासींची परिस्थिती बदलत गेली.जीवनात बाजारू प्रत्ती शिरल्या.सावकार व्यापारी दलाल सरकारी कर्मचारी या बाहेरच्यांनी त्यांच्या जीवनाचे क्षेत्र व्यापले.त्यातून आदिवासी कर्जबाजारी झाला.त्यांच्या जमीनी बळकावल्या गेल्या.मजूर म्हणून त्यांची पिळवणूक होतच राहिली.पारंपरिक जीवन पद्धती उध्वस्त झाली.दारिद्रय वाढले.ख्रिस्ती धर्म प्रसारकांनी त्यांच्या कला संस्कृतीवर प्रभूत्व निर्माण केले.त्यातच आदिवासींच्या उपजीविकेचे महत्त्वाचे साधन म्हणजे जंगल पण शेतीसाठीच्या जंगल तोडीने हे उपजीविकेचे साधनच नष्ट होऊ लागले.इंग्रज शासनानेही जंगल वापराबाबत निर्बंध घातले.पोलीस व वनरक्षकांनी जुलूमाचा

कळस गाठला.आदिवासी भागातून मिळणारे लाकूड जंगल संपदेवर मालकी प्रस्थापित करणे व या भागातून रस्त्यांचे जाळे विणून साम्राज्य दृढ करणे हे इंग्रजांचे धोरण होते.त्यामुळे इंग्रजांनी आदिवासी प्रदेशावर अतिक्रमण सुरू केल्याने आदिवासी संस्कृतीस धोका निर्माण झाला.यामुळे आदिवासींमध्ये मोठयाप्रमाणावर असंतोष वाढून अनेक ठिकाणी आदिवासींचे उठाव झाले.शेतकरी उठावाप्रमाणेच हे उठाव देशपातळीवर संघटित नव्हते तर त्यांचे स्वरूप स्थानिक होते.असे अनेक उठाव भारतात झाले.

## १९२० पूर्वीची आदिवासी चळवळ

१७६३ पासून आशा उठावांना सुरवात झाली. १८५७ च्या उठावापूर्वी भारतात संन्याशी उठाव (१७६३), चुआर उठाव (१७६८), फकीरांचे बंड (१७७६-१८००), तमार उठाव (१७८९), खेरवारच्या संथाळांची चळवळ (१८३३), हो जमातीचे बंड (१८२०), खासींचा उठाव (१८२४), कुकींचे बंड (१८२६), कोळ्यांचे बंड (१८३१), खोंड जमातीचा उठाव (१८३६), फराईसी व पागलपंथीयांचा उठाव (१८३८), सिंगपो जमातीचा उठाव (आसाम) उमाजी नाईकाचे बंड (१८२६), इत्यादी अनेक उठाव घडून आले होते. इ.स. १८५८ नंतर राष्ट्रवादाची जागृती व प्रसार होवू लागला होता.याच दरम्यान सिदो व कान्हू नेतृत्वात संथाळांची चळवळ उभी राहिली. १८९० दरम्यान सरदारी लराई किंवा मुक्ती लराई चळवळ प्रभावी होती. इ.स.१८९५ ते १९०१ या काळात बिरसा मुंडा याच्या नेतृत्वाखाली मुंडा उठाव झाला.पुढे जन आंदोलन काळात ही आदिवासी चळवळ अधिकच व्यापक झाली.

## १९२० नंतरची आदिवासी चळवळ

### गुजरातमधील देवी चळवळ

दक्षिण गुजरातमध्ये इ.स. १९२२-२३ च्या दरम्यानं सुरू झालेली देवी चळवळ सुरवातीला सामाजिक चळवळ होती. मांस खाणे, दारू किंवा ताडी पिणे, बकरी किंवा कोंबडी कापणे किंवा विकणे यासारख्या गोष्टीपासून आदिवासी लोकांनी दूर रहावे असा आदेश सालबाई देवीने दिला आहे, असे या चळवळीमध्ये गृहीत धरले होते. दारूपुरवठा करणाऱ्या पारसी आणि जमीनदारांवर बहीष्कार टाकावा. जे लोक देवीचे आदेश मानणार नाहीत त्यांना दुर्दैवाला, कदाचित मृत्युलाही सामोरे जावे लागते असा प्रचारत्यांनी केला. डिसेंबर १९२२ पर्यंत सुरत शहरासह आदिवासी परीसरात ही चळवळ पसरली. आपले शोषण करणाऱ्या वर्गांना या चळवळीने आपले लक्ष बनविले. दारूचा व्यापार करणारे पारसी, सावकार, जमीनदार, मुस्लीम यांच्याबरोबर काम करण्याचे नाकारले. पारसी लोकांची सावली आंगावर पडली तरी आदिवासी आंघोळ करू लागले.

सुरवातीला ही चळवळ धार्मिक किंवा सामाजिक स्वरूपाची असली तरी १९२२ पासून असहकार चळवळीचा भाग बनली. परदेशी कपड्यांची होळी करा व सरकारी शाळांवर बहिष्कार टाका असे आदिवासींनी सांगण्यास सुरवात केली. जलालपूर तालुक्यातील एका ताडी दुकानदाराला दंड म्हणून राष्ट्रीय शाळेला १२० रूपये देणगी द्यावयास लावली. १९२१ पासून बार्डोली तालुक्यात गांधीजींच्या कायकर्त्यांनी आदिवासी समाजात कार्य करण्यास सुरवात केली होती. सविनय कायदेभंग चळवळीपूर्वीच गांधीजींनी आदिवासींना आपल्या चळवळीत सामावून घेण्यास सुरवात केली. आदिवासींनी राष्ट्रीय चळवळीला पाठींबा देण्यास सुरवात केली. काही काळात गांधीजीचे नाव देवी चळवळीशी जोडले गेले. त्यानंतर काँग्रेस नेत्यांनी बार्डोलीला भेटी देऊन देवी चळवळीच्या बैठकांना खादी वापरून देवीचा संदेश पसरविण्याचा सल्ला दिला. काँग्रेसने २१ जानेवारी १ ९ २३ रोजी सरदार वल्लभभाई पटेलांच्या अध्यक्षतेखाली कालीपराज परिषद भरविली होती. या परिषदेला २०,००० आदिवासी हजर राहिले. या परिषदेने ताडीची झाडे तोडण्याचा, दारू दुकाने बंद करण्याचा व खादी वापरण्याचा संदेश देणारा ठराव पास केला. त्यानंतरच्या दोन दशकात आदिवासी चळवळीने गांधीजींच्या चळवळीला पाठींबा दिला.

**मीदनापूरमधील आदिवासी चळवळ (१९१८-१९२४)**

मीदनापूरमधील जंगल महालातील संथाळ भूमीजी व कुर्मी (महतो ) या आदिवासी जमातींनी १७६० मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या विरोधात उठाव केला होता. परंतु ब्रिटिशांनी त्या प्रदेशात आदिवासींच्या जमीन प्रमुखांऐवजी जमिनदारांची नेमणूक केली. १९ व्या शतकाच्या शेवटी बाहेरून आलेल्या जमीनदारांनी आदिवासींच्या जमिनीवर अतिक्रमण केले. इतर आदिवासी जमातीप्रमाणेच या प्रदेशातील आदिवासी जमातींचीही जमीनदार, सावकार, व्यापारी यासारख्या उपऱ्यांकडून पिळवणूक होऊ लागली. आदिवासी जमातीमध्ये या उपऱ्यांबद्दल असंतोष निर्माण झाला.

जंगल महाल आणि शेजारच्या बँकुरा व सिंगभूम पट्ट्यात ब्रिटिशांविरूद्ध आदिवासींनी १९२१ ते १९२३ च्या दरम्यान चळवळ सुरू केली. १९२१ पर्यंत काँग्रेसचा या भागात फारसा संपर्क नव्हता. १९२१ पासून सी.आर.दास यांनी या भागात जागृती सुरू केली. त्यामुळे असहकार चळवळीशी सामांतर चळवळ सुरू झाली. युरोपीयन जमीनदारांनी ' मीदनापूर जमीनदारी कंपनी ' स्थापना करून आदिवासींचे शोषण सुरू केले होते. काँग्रेसने जमीनदारी कंपनीविरोधात मोहिम सुरू केली. त्यांच्या जमिनीवर काम करणाऱ्या आदिवासींचा संप घडवून आणला. जमीनदारी कंपनीने न्यायालयात जाण्याचे ठरवले. दरम्यान संपाचे रूपांतर उठावात झाले.

जुलै १९२१ मध्ये २०० संतरत स्त्रियांच्या मोर्चाचे नेतृत्व शैलजानंद सेन यांनी केले. त्यांनी जमीनदारांच्या भाताच्या गाड्या आडविल्या. मे १९२१ मध्ये काँग्रेसने ७०० संथाळांची एक बैठक घेवून दारू पिण्यापासून दूर रहाण्याचे ठरविले. शैलाजानंद व मुरारी मोहन रॉय यांनी आदिवासींना परदेशी मालावर व विशेषतः कपड्यांवर बहीष्कार घालण्याचे आपल्या भाषणातून अवाहन केले. १९२२ मध्ये परदेशी कपड्यावर बहीष्कार घालण्याची मोहिम खूपच प्रसिद्धीस आली. आदिवासींनी काँग्रेसबरोबर आपले चांगले संबंध असल्याचे दाखवून दिले. १९२२ मध्ये चौरीचौरा प्रसंगामुळे गांधीजींनी चळवळ आचनकपणे बंद केली. परिणामी आदिवासींची चळवळ एकाकी पडली व बाहेरच्या संबंधापासून वंचित राहिली.

१५ ते २१ मे १९१८ मध्ये मयूरभंजमधील संथाळांनी सरकारच्या विरोधात उठाव केला. आदिवासींची सक्तीने कामगार भरती केली जाणार होती. परंतु संथाळांच्या उठावामुळे सरकारला नोकर भरतीची योजना रद्द करावी लागली. १४ जून १९१८ रोजी संथाळांनी जंगलकायदा, चौकीदारी कर इ. बंधनांच्या विरोधात उठाव केला. संथाळांच्या एकत्रीत प्रयत्नांमुळे सरकारचे सर्व उपाय कुचकामी ठरले. संथाळांनी उठावाची व्याप्ती वाढवून सरकारच्या सर्व प्रकारच्या दडपशाहीतून सुटका करवून घेण्याचा प्रयत्न चालविला. ऑगस्ट १९२२ मध्ये आदिवासींनी जंगलांचा वापर करणे व तलावातून मासेमारी करणे हे आपले पारंपारिक हक्क असल्याचे ठासून सांगितले. पुढे ही चळवळ केवळ ' मीदनापूर जमीनदारी कंपनी ' पुरती मर्यादित न राहता, भारतीय जमीनदारांच्या विरोधातही सुरू झाली.

**माल्दा (Malda ) मधील जीतू संथाळची चळवळ**

इ.स.१९२४ ते १९३२ च्या दरम्यान माल्दा जिल्हयातील जमीनदारांच्या विरोधात संथाळांनी चळवळ चालू केली. ही चळवळ राष्ट्रीय चळवळीबरोबर गुंफली गेली. जमीनदारांबरोबरच या संघर्षात स्वराज्य पक्षाने कुळांना पाठींबा दिला. त्यामुळे या चळवळीचा नेता जीतू संथाळचा स्वराज्य पक्षाबरोबर घनिष्ट संबंध आला. त्यामुळे या चळवळीला हिंदू जातीयवादाची छटा प्राप्त झाली होती. त्याभागातील आदिवासी समाजात काम करणारे स्वराज्य पक्षाचे कार्यकर्ते काशीश्वर चक्रवर्ती ' संन्याशी बाबा ' या नावाने ओळखले जात होते. जीतू संथाळच्या मदतीने त्यांनी संन्याशी दल स्थापन केले. त्यांनी आदिवासींना त्यांची आदिवासी म्हणून असलेली ओळख सोडून दिल्यास हिंदू धर्मात त्यांना चांगला दर्जा देण्याचे आश्वासन दिले.

जीतूने १९२८ मध्ये संथाळांना जमीनदारांच्या पिकाची लूट करण्याच्या सूचना दिल्या. त्याने शेतकऱ्यांना कुळांचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर लुटीच्या खूपच घटना घडू लागल्या. ३ डिसेंबर १९३२ मध्ये जीतूने संथाळाच्या चळवळीचे हिंदुत्ववाद्यांच्या चळवळीत

रूपांतर केले. पाडुआ या शहरातील आदीना मस्जीद ताब्यात घेऊन तिचे मंदिरात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश राजवटीचा शेवट होऊन आपले स्वतःचे राज्य निर्माण झाल्याचे घोषित केले. त्याचे स्वराज्य पक्षाशी असलेले संबंध आणि हिंदुत्ववादी चळवळीमुळे माल्दामधील राष्ट्रवादी हिंदुनी त्याला पाठिंबा दिला. या चळवळीने संथाळांना हलाखीच्या अवस्थेत आणून सोडले. या चळवळीच्या अपयशाचा परिणाम म्हणजे जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढल्या, कुळांना त्यांच्या जमीनीवरून हाकलून लावले, जमीनदारांनी जादा दराने कर आकरणी करण्यास सुरवात केली, आदिवासीचे इतरही मार्गांनी शोषण होवू लागले. या सर्व समस्या १९३० च्या दशकात वाढीस लागल्या.

## ओरिसातील आदिवासी आणि राष्ट्रीय चळवळ

ओरीसा आणि बिहारमधील कटक, पुरी, बालासोर, अंगुल, खोडमाला या ओरीसा विभागात ही चळवळ विस्तारित झाली होती. शेतकऱ्यांसह आदिवासी जमातींनी १९२० व १९३० च्या दशकात राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला. त्यांनी असहकार चळवळीत भाग घेऊन कर भरण्यास नकार दिला. फेब्रुवारी १९२२ मध्ये शेतकरी आणि आदिवासींनी जंगलात घाडी घालून जंगल कायदा मोडला. शेतकऱ्यांनी कर भरण्याचे नाकारले. जे कर भरतील त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला. मे १९२१ मध्ये सरकारने १४४ कलम पुकारून अनेक आदिवासींना अटक केली. त्यामुळे भुयान आदिवासी संतप्त झाले व त्यांनी सुपरीटेडेंटच्या बंगल्याला घेराव घातला. मात्र सरकारने अटक केलेल्यांना न सोडता तुरूंगात टाकले. ही चळवळ हळुहळु शांत पुढील काही दिवसात झाली.

अल्लुरी सीताराम यांच्या रांम्मा उठावाने ओरीसातील आदिवासींना जंगल कायद्याविरूद्ध उठाव करण्यास प्रोत्साहित केले. १९२० ते १९३० च्या दरम्यान गुणपूरच्या आदिवासींनी कर न भरण्यासाठी संघर्ष सुरू केला. त्यांनी जंगलविषयक कायदे मोडण्यास सुरवात केली. त्यांना नियंत्रणात आणणे कठीण झाले. खोंड आदिवासींनी सुद्धा कर भरणे बंद केले. त्यांनी पोलीसांवर हल्ले केले. त्यामुळे अनेक जणांना अटक झाली. जमीनदार, सावकार यांची दडपशाही, व शोषण, पिळवणूक आणि दोष पूर्ण जंगल कायदे यामुळे कोरापत आणि गंजम प्रदेशातील आदिवासींनी सविनय कायदेभंग चळवळीला चांगलाच प्रतिसाद दिला.

## आदिवासी सुधारक व चळवळीचे नेते

आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक सुधारक अनेक संस्था पुढे आल्या.अनिष्ट रूढीपासून मुक्तीबरोबरोच शिक्षण राहणीमान आरोग्य आर्थिक स्वावलंबन स्त्री उद्धार अशा अनेक क्षेत्रात या सुधारक व संस्थांनी योगदान दिले.त्यातून आदिवासी चळवळ विकसीत झाली.

**१.ठक्कर बाप्पा**

म.गांधींजींच्या सूचनेनुसार आदिवासी विकासासाठी ठक्कर बाप्पांनी अत्यंत मोलाचे कार्य केले आहे.मुख्यत्वे भिल्लांच्या शैक्षणिक व सामाजिक सुधारणेचे कार्य त्यांनी केले.त्यांच्या कार्याचे मोल लक्षात घेऊन गांधींजी त्यांचा उल्लेख भिल्लांचे धर्मगुरू असा करत.

**२.शामराव व गोदावरी परूळेकर**

वारली आदिवासींमध्ये परूळेकरांचे कार्य मोठे आहे.किसान सभेद्वारे आदिवासी संघटन व जागृतीचे कार्य शामराव व गोदावर परूळेकर यांनी केले.वारली आदिवासींच्या हक्कांसाठी संघर्ष उभारला.जमीनदार सावकार आदिवासींना फुकट राबवून घेत याविरोधात त्यांनी आंदोलन केले.

**३.ताराबाई मोडक**

समाजसेविका ताराबाई मोडक यांचे ठाणे जिल्*यातील कोसबाड येथील आदिवासींसाठींचे शिक्षण कार्य विशेष उल्लेखनीय आहे.तेथे त्यांनी लहान मुलांसाठी अंगणवाडया सुरू केल्या.मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण केली.प्रत्यक्ष कामातून गप्पा वा चर्चातून शिक्षण देण्याची पद्धत त्यांनी राबविली.जनावरे व त्यांच्यासाठीचे कुरण हा आदिवासी जीवनातील महत्त्वाचा घटक असल्याचे ओळखुन कुरण शाळा सुरू केल्या.

**४.पद्मश्री अनुताई वाघ**

ताराबाईंच्या सहवासातून अनुताईंनाही समाजसेवेची प्रेरणा मिळाली.त्यांनी कोसबाडला आदिवासी कल्याणासाठी संस्था उभारली.त्याला कोसबाड प्रकल्प म्हणतात.यात प्रामुख्याने शिक्षण प्रसारावर लक्ष केंद्रित केले.पाळणाघरा पासून सुरूवात करत पुढे बालवाडी मग प्राथमिक शाळा करत उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयही स्थापन केले.शिक्षकांसाठी बालसेविका ट्रेनिंग स्कुल व प्रौढासाठीही शिक्षण वर्ग सुरू केले.

याशिवाय इतर अनेक सुधारक व संस्थांचेही योगदान मोलाचे आहे.वारलींवरील सावकारी अन्यायाविरोधातील बाळासाहेब खेरांचा लढाही महत्त्वाचा आहे.जव्हार संस्थानात का^.देवकीचरण चौधरी यांनी आदिवासी सेवा मंडळाच्या माध्यमातून मोठे कार्य केले.बापूराव कृष्णाजी देशमुख यांनी आदिवासींच्या सामाजिक आर्थिक उन्नतीसाठी कार्य केले.श्री मारूती बांडे, डा^.वाडिवे, श्री विश्वेश्वरराव धर्मराव महाराज, श्री बाबूराव मडावी, श्री महादेव कडू, श्री सुखदेव उईके अशा अनेकांच्या योगदानातून आदिवासी चळवळ व्यापक झाली आहे.

**समारोप**

आदिवासी प्रदेश ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्यात समाविष्ट करण्यापूर्वी त्यांची स्वतंत्र आर्थिक आणि सामाजिक जीवनपद्धती होती. जमीन आणि जंगल ही त्यांच्या चरीतार्थाचे प्रमुख

साधने होती. ब्रिटिशांनी त्यांच्या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर वसाहतवादी धोरणांचा अवलंब करून आदिवासींची जीवनपद्धती विस्कळीत केली. नवे कायदे जमीनदारी, कारखानदारी, मध्यस्थ, सावकारी इ. सर्व वसाहतवादाचे हस्तक आदिवासी जमातींना आपले संघर्ष चालू शत्रू वाटू लागले. आदिवासी जमातींनी सुरवातीला आशा (डिकू) उपन्याविरूद्ध केला. नंतर त्यांच्या चळवळीने वसाहतवादा विरोधी स्वरूप धारण केले. त्यांची चळवळ प्रामुख्याने हिंसक स्वरूपाची होती. जमीनदार, सावकार यासारख्या उपन्यांवर हल्ले करून त्यांना ठार करून त्यांची घरेदारे पेटवून दिली. सरकारने शांतता प्रस्थापित करण्याच्या नावाखाली त्यांना गुन्हेगार जाहीर केले. त्यांना तुरूंगात डांबून अनेकांना फासावर लटकविले. या आदिवासी जमातीच्या चळवळी राष्ट्रीय चळवळीशी फारशा सलग्न नसल्या तरी काही ठिकाणी त्या समांतर होत्या.

वसाहतवादी ब्रिटिशांच्या काळात शेतकरी व आदिवासी या असंघटित सर्वसामान्य जनतेने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी चळवळी उभ्या केल्या व ब्रिटिश सरकार व त्यांच्या मध्यस्थांच्या विरोधात उठाव घडवून आणले. शेतकऱ्यांच्या चळवळी सुरवातीस असंघटीत स्वरूपात होत्या. कालांतराने त्या त्या प्रदेशातील शेतकरी एकसारख्या समस्यांमुळे एकत्र आले. महात्मा गांधीजींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास सुरवात केल्यानंतर शेतकरी चळवळ व राष्ट्रीय चळवळ यांचा संबंध येऊ लागला. सविनय कायदेभंग चळवळीनंतर शेतकरी चळवळीला राजकीय स्वरूप येऊ लागले. समाजवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेनंतर अखिल भारतीय किसान परिषद स्थापन झाली. त्यामुळे शेतकरी चळवळ राष्ट्रीय पातळीवर जाऊन पोहोचली.

आदिवासी चळवळी सुरवातीपासून शेवटपर्यंत आपापल्या भागापुरत्या मर्यादित राहिल्या. त्यांचे दैनंदिन जीवन अवलंबून असलेल्या जमीनपद्धती व जंगले यांच्या वापराच्या पद्धतीत ब्रिटिशांनी बदल घडवून आणला हेच त्यांच्या असंतोषाचे मुख्य कारण होते. आदिवासी जमातींनी आपापल्या जमातीच्या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली हिंसक चळवळी केल्या. जमात प्रमुख आपणास दैवी शक्ती प्राप्त झाल्याचे किंवा जादू जादूटोणा येत असल्याचे सांगत.ब्रिटिशांबरोबर होणाऱ्या संघर्षात आपलाच विजय होणार असे सांगून आपल्या जमातीचा पाठिंबा मिळवत. एका बाजूला धनुष्यबाण, भाले यासारख्या परंपरागत शस्त्रांनी सज्ज आदिवासी व दुसऱ्या बाजूला आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज, प्रशिक्षित ब्रिटीश सैनिक यांच्यातील असमान संघर्षात हजारो आदिवासी मरण पावले.